NAVJYOT / Vol. XII / Issue – IV ISSN 2277-8063

# वंदनीय राष्ट्रसंताचे समाज प्रबोधनपर विचार

**डॉ.विवेक गं. देशमुख** (मराठी विभाग प्रमुख) स्व.पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, वरुड, जि.अमरावती.

---

महाराष्ट्र ही थोर संताची भूमी आहे. या संताच्या पंरपरेतीलच एक संत म्हणजे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ते आधुनिक काळातील महान संत, कवी, साहित्यिक त्याचबरोबर समाज प्रबोधनकार होते. संताचे खरे कार्य समाजात चारित्र्य निर्माण करणे, विषमता नष्ट करणे, समाजातील अज्ञान आणि दुबळेपणा घालवून नवे राष्ट्र उदयास आणणे हे होय. त्यांनी आपल्या अमोघ वाणीने व लेखणीने हातात खंजिरी घेऊन गावागावात जाऊन समाज प्रबोधनाचे काम केले. आपल्या विचारांना कर्तृत्वाची जोड देणारे राष्ट्रसंत खऱ्या अर्थाने कर्ते समाजसुधारक होते.त्यांची समाजसुधारणेची आंतरिक तळमळ, 'ग्रामगीता' या ग्रंथामधून दिसून येते.

जीवनाच्या सर्वच अंगाना स्पर्श करणारे त्यांचे कार्य आहे. समाजाचा कोणताही घटक असो त्यांच्या कल्याणाची तळमळ राष्ट्रसंताना लागलेली दिसून येते. आपल्या भजनांमधून, भाषणतून आणि प्रवचनातून माणूस शहाणा करण्याचे आणि त्यांच्यात माणुसकीची ज्योत जागविण्याचे कार्य राष्ट्रसंतानी अहोरात्र केले ते अत्यंत मोलाचे आहे.

'सामुदायिक प्रार्थनेच्या' माध्यमातून राष्ट्रसंतांनी सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात क्रांती घडवून आणली. संघटन उभारणीचे एक उत्कृष्ट माध्यम म्हणजे 'सामुदायिक प्रार्थना' हे सांगताना ते म्हणतात, ''सामुदायिक प्राथनेची पूर्णता दुसऱ्याला आपला मानन्यात आहे. भगवान जळी–स्थळी भरला आहे. अशी ज्याक्षणी आमची धारणा होते, त्या क्षणी अवघे विश्व एकच कुटुंब आहे असे वाटायला लागते.... आम्ही फक्त सामुदायीक प्रार्थना आणि मंदिरे एवढयाच पवित्र जागा मानतो; परंतू आता ही भावना व्यापक बनवली पाहिजे. रस्त्यात उभा असलेला माणूस सुध्दा प्रेममूर्ती आहे. पवित्र आहे. तो व मी एकच विश्वमंत्राचे घटक आहोत अशी भावना वाढत गेली पाहिजे. समाजात सुव्यवस्था प्रस्थापित करणे आणि परस्पर सहकार्याची व सहानुभूतीची भावना प्रसृत करणे हे धर्माचे एकमेव काम आहे. हा उद्देश जर साध्य होत नसेल तर धर्म मेला असेच मानावेलागेल.... आमच्यात विश्वव्यापी दृष्टिकोन यावा यासाठी वेदातील ऋषींनी 'सर्वेत्र सुखिन सन्तु' अशी प्रार्थना करुन ठेवली. आपल्याला हेच काम सामुदायिक प्रार्थनेतून नव्या धर्मपध्दतीव्दारा करायचे आहे. केवळ मानवाचे नाही तर अखिल विश्वाचे उत्थान आणि सर्व धर्माचा समन्वय घडवून आणण्याची शक्ती सामुदायिक प्रार्थनेत असल्याचे ते सांगतात,''

''सर्व धर्माचा समन्वय । विश्वशांतीचा उपाय ।
लोक सुधारणेचे विद्यालय । सामुदायिक प्रार्थना ।।''

ही सामुदायिक प्रार्थना रोज गावोगावी, खेडोपाडी व घरोघरी म्हटल्या गेली पाहिजे यामुळे राष्ट्रभावना वाढीस लागेल यावर त्यांचा कटाक्ष होता.

देव, धर्म आणि भक्ती हे अध्यात्माचे विषय असून ते त्याज्य न करता त्यातील सामाजिक विकासाला पोषक असणारी तत्त्वे राष्ट्रसंत समाज सुधारणेसाठी आवश्यक मानतात. देव नावाची संकल्पना समाजामध्ये रुजली की, त्यासोबत मूर्तीपूजा ही होणारच परंतुया मुर्तिपूजेचे मूळ स्वरुप विशद करतांना म्हणतात,

'' मूर्तिपूजेचा अर्थ एक । आपण मूर्तीच व्हावे सम्यक् ।
म्हणजे करावी तैसी वागणूक । अभ्यासाने ।। ''

मूर्ती ज्याची असेल त्याच्या उज्ज्वल चारित्र्याचा, पवित्र गुण स्वभावाचा, उच्च सेवा कार्याचा आदर्श समोर ठेवून त्याचा स्वीकार आपल्याला करावा लागेल. मूर्ती ही फक्त निमित्त असून तिच्यासमोर येण्याने ती ज्याची असेल त्याचे आदर्शगुण आपल्या अंगी कसे येतील हा विचारच या ठिकाणी महत्त्वाचा असल्याचे दिसून येते.

राष्ट्रसंतांना पूजा–अर्चा, व्रत–वैकल्ये करायला लावणारा आणि पोथी–पुराणांचे पारायण करावयास लावणारा देवधर्म नको आहे. म्हणूनच त्यांनी देवाला देवळाच्या चार भिंतीत बंदिस्त न ठेवता 'देव आहे जगदांतरे' या उदात्त भावनेने प्रेरित होऊन, संत तुकोबांच्या ''देवळीचा देव मेला । अंतरीचा जागवा रे '' या वचनानुसार अंतरीचा देव जागवून त्या देवाला समष्टि स्वरुप दिले हा त्यांच्या समाजप्रबोधनाचा धार्मिक पैलू असून या संदर्भात त्यांची ओवी महत्वाची आहे.

'' मंदिरी बैसोनि नाक दाबावे । त्यापेक्षा मार्गाचे काटे उचलावे ।
दुःखितांशी प्रेमे पाणी पाजावे । हे श्रेष्ठ तीथ्र स्नानाहुनी ।।''

मंदिरात जाऊन, नवस करुन देव प्राप्त होतो का? यापेक्षा दुःखितांना प्रेम देऊन त्यांना सुखी करणे हिच माणसामधल्या माणुसकीची खरी ओळख होय हा कृतिशील मार्ग दाखविला.

'धर्म' विषयक कल्पनेचे विश्लेषन करतांना राष्ट्रसंतांनी म्हटले आहे,

''धर्म नही कहता है किसिके बहुबेटीपर निगाह करो ।
धर्म नही कहता है किसिके घर लूटो बरबाद करो ।
धर्म नही कहता है किसिके मजहबपर आघात करो ।
धर्म नही कहता है कोईभी जीवोंपर हथियार धरो।।''

यातून राष्ट्रसंतांच्या देव व धर्मनिष्ठ विचारांना लौकिक व्यवहाराचे फार मोठे अधिष्ठान असल्याचे दिसून येते. देव–धर्मनिष्ठ विचार आणि लौकिक व्यवहार यांचा सुंदर समन्वय साधून सामाजिक प्रबोधनाचे, परिवर्तन घडवून आणण्याचे मौलिक कार्य केले.

आज मनुष्याला अनेक वाईट गोष्टींची संवय लागलेली आहे. ती चटक त्यांच्या नाशाला कारणीभूत ठरताहेत. विविध तऱ्हेच्या दुर्गुणांचा, दुर्व्यसनांचा युवकांवर वाईट परिणाम झालेला आहे. देशाला घडवणारी युवा पिढीच जर बिघडली तर देशाचे काय होणार ! अशी चिंता राष्ट्रसंतांना लागली होती म्हणूनच त्यांनी दुर्गुण व दुर्व्यसने सोडून जीवनसुखी, समृध्द, समर्थ व सुंदर बनविणाऱ्या सद्गुणांचा विकास अंगी बाळगण्याचा मौलिक सल्लाहीत्यांनी दिलेला आहे,

" निर्मल विमल जब आचरण । तेरा खुदही बन जायगा ।
तब सौख्य क्या ? तू स्वर्ग का आनंदभी आजमायगा ।।"

'वर्णव्यवस्था' या अध्यायात त्यांनी परंपरेने चालत आलेल्या जन्मावर आधारित असलेल्या वर्णव्यवस्थेचा धिक्कार करुन गुणकर्मावर आधारित असलेली व्यवस्था त्यांनी मानली जसे ज्याचे कर्म असेल तसा त्याचा दर्जा व महत्त्व सांगताना म्हणतात,

"शुद्राघरी उत्तम वर्तनी । तो शुद्रचि कैसा राहीला ?
तैसा क्षत्रियाघरि भ्रष्ट निपजला । तो क्षत्रिय कैसा ?

राष्ट्रसंतांची ही भूमिका परंपरेपेक्षा निश्चितच वेगळी असूनसमाजाला पोषक ठरणारी आहे.

राष्ट्रसंतांचे स्वातंत्र्यपूर्वकाळातील लोकजागृतीचे अभियान महत्वाचे आहे. 1930 च्या विदर्भ गोंडवनातील सत्याग्रही शिबिरामध्ये त्यांनी आपल्या ओजस्वी राष्ट्रीय भजनाने लोकांच्या मनात स्वातंत्र्याचा स्फुलिंग चेतविला, 1942 च्या असहकार आंदोलनात चिमूर आणि आष्टी येथील सत्याग्रहात त्यांनी भाग घेतल्याबद्दल दि.28/8/1942 ला अटक होऊन मध्यप्रदेशातील रायपूरच्या कारागृहात रवानगी झाल्यानंतर तेथेही खंजेरी भजनाच्या माध्यमातून तुरुंग हादरवून सोडण्याचे काम केले. तेथून सुटून आल्यानंतर पुन्हा आपल्या कामाला सुरवात केली. स्फुर्तिदायक भजने गाऊन इंग्रजी सत्तेच्या विरुध्द लढण्याची प्रेरणा युवकांना देऊन त्यांच्यामधील स्वत्व, स्वदेश, स्वातंत्र्य अशा भावना जाग्या केल्या आणि त्यांना स्वातंत्र्य लढयात भाग घेण्यास प्रोत्साहन दिले.त्याचप्रमाणे शृंखलाबध्द असलेल्या भारतमोतची हाक साधु–संताच्या कानावर घालून 'संत महंतो! जाग उठो!' अशा शब्दात देशासाठी कार्य करण्याची स्फूर्ती त्यांच्यात निर्माण केली या स्फूर्तीप्रद आवाहनाला प्रतिसाद देत त्यांनीही स्वतःला स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडातझोकून दिले. ही राष्ट्रसंतानी केलेली विलक्षण बाब आहे.

सन 1943 मध्ये 'गरुदेव' मासिक काढले. 'अखिल भारतीय गुरुदेव सेवामंडळ' स्थापन केले. याव्दारे प्रत्यक्ष कृतीपर कार्यक्रम राबवून त्यांनी जनसेवेचे महत्व पटवून देऊन ईश्वर कोठे शोधावा हे सांगतांना म्हणतात,

"जाणावे ग्राम हेची मंदिर । ग्रामातील जन सर्वेश्वर
सेवा हीच पूजा समग्र । हाची विचार निवेदावा ।।"

ग्रामसुधारणेशिवाय देशाची प्रगती होऊ शकत नाही हा विचार त्यांनी जनतेसमोर सातत्याने मांडलेला आहे. भारतासारख्या कृषीप्रधान आणि खेडीप्रधान देशाला सर्वार्थाने संपन्न करावयाचे असेल तर ग्रामाचा विकास महत्वाचा ठरतो. खेडयातील जनतेचे जीवन समृध्द झाले तरच देश समृध्द होईल.खेडेगाव जर स्वंयपूर्ण झाले तरच राष्ट्राची उन्नती आणि विकास शक्य आहे. याच दृष्टिकोनातून त्यांनी समाजहितैषी दृष्टी ठेवून कार्य केले.अशा नेतृत्वाची गरज आज समाजाला आवश्यक आहे.

त्यांनी राजकीय जीवनाची विस्कटलेली घडी सावरण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. सर्वसामान्य समाजाचा राजनीतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बरोबर नव्हता तो आजही नाही, तेव्हा राष्ट्रसंतांनी त्यांना विशुध्द राजनीतीचे पाठ दिले. 'यथा राजा, तथा प्रजा' या वचनाप्रमाणे राज्यकर्त्यांनी प्रजेपुढे आपल्या शुध्द आचरणाचा आदर्श ठेवावा असेही ते म्हणतात. आदर्श राज्याची संकल्पना त्यांनी भजनाच्या माध्यमातून मांडली,

"पिछडों को दो साथ । अनपढों, को दो हाथ ।
करो मानव एकजात । समता की हो बात ।
सडक बनाओं, ग्राम सजाओं । करो कुएं तालाब ।
आवो शिक्षित भाई । राव और रंक ईसाई ।
महन्त पंडीत कोई । हिंदु तुर्क ईसाई ।
कारकून हो या गुरुजन हो । लो फावडा टिकास।
सुंदर देश बनालो अपना । सबमे भरो उल्हास ।"

त्यांनी काळानुरुप प्रबोधनाच्या माध्यमात बदल करतजनमानसाला वळण लावण्याचेही कार्य केले. त्यांचे साहित्य सर्व मानवजातीच्या उन्नतीसाठीमार्गदर्शन करणारे अक्षर वाङ्मय आहे. त्यांनी केलेले कार्य पाहूनच सन 1949 सालीतत्कालीन राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनीत्यांना 'राष्ट्रसंत' ही उपाधी बहाल केली.

**निष्कर्ष** :–1) भेदभाव विसरुन संपूर्ण समाज मानवतेच्या व्यासपीठावर एकत्र आला पाहिजे हाराष्ट्रसंतांचा विचार आजच्या समाजाला उपयुक्त ठरेल.

2) मनुष्याला दुर्गुण व दुर्व्यसने सोडून सद्गुणांचा विकास अंगी बाळगण्याचा मौलिक सल्ला देतात.

3) पुर्वापार चालतआलेल्या वर्णव्यवस्थेचा धिक्कार करुन गुणकर्मावर आधारलेली व्यवस्थात्यांना अभिप्रेत आहे.

*NAVJYOT / Vol. XII / Issue – IV* *ISSN 2277-8063*

4) समाजमनात आशावाद निर्माण करुन, स्वातंत्र्याचा स्फूलिंग चेतवून वीर निर्माण करण्याचे, राष्ट्रजागृतीचे काम केले.

5) खेडी जितकी सशक्त, सुदृढ होईल तितका देश मजबूत, बलवान होणार हा त्यांचा दृष्टिकोन दिसून येतो.

6) राज्यकर्त्यांना प्रजेसमोर आपल्या शुध्दआचरणाचा, आदर्श ठेवण्याचा सल्ला त्यांनी दिलेला आहे.

**संदर्भ :–**

1)देशपांडे, अ.ना., राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराजांचा हितबोध, श्रीगुरुदेव प्रकाशन, अमरावती., 1999.

2) गोळे, रवींद्र, आधुनिक संत आणि समाज, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 2017.

3) घोडे, राम, समर्थ रामदासः संत तुकडोजी– तौलनिक दर्शन, राजीव प्रकाशन, नागपूर, 1988.

4) काळे, अक्षयकुमार (संपा.), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्ती आणि वाङ्मय, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर, 2008.

5) लोकराज्य (मासिक), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, नोव्हे.2000.

6) अक्षरवैदर्भी (विशेषांक), एप्रिल., मे., 1997.